# १६.

# महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद, नागपूर

# १६. महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद, नागपूर

**१) स्थापना :-**

१) भारतीय पशुवैद्यकीय परिषद कायदा, १९८४ अंतर्गत महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

२) महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद ही राज्यस्तरीय स्वायत्त संस्था आहे.

३) महाराष्ट्र राज्यामध्ये भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, दिनांक १ ऑगस्ट १९९७ पासून लागू करण्यात आला.

४) या परिषदेची कार्यवाही दिनांक २६ जून १९९८ पासून पुणे येथे सुरू झाली.

५) दिनांक ३१ मार्च २००१ चे शासन निर्णयाप्रमाणे दिनांक ६ जुलै २००१ पासून नागपूर मुक्कामी परिषदेचे कार्यालय सुरू झाले.

**२) उद्देश/कर्तव्ये :-**

१) भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ चे परिशिष्ट-एक व दोन अंतर्गत मान्यताप्राप्त अर्हताधारक पदवीधर पशुवैद्यकांची नोंदणी करणे.

२) प्रत्येक पाच वर्षांनी नोंदणीचे नूतनीकरण करणे.

३) पदव्युत्तर अर्हतेची नोंद करणे.

४) इतर राज्यामध्ये बदलून जाणाऱ्या नोंदणीकृत उमेदवारांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे तसेच इतर राज्यामधून बदलून येणाऱ्या नोंदणीकृत व्यक्तींची नोंदणी करणे.

५) पदवीपूर्व काळात प्रात्यक्षिक अभ्यासक्रमाकरिता तात्पूरते नोंदणी प्रमाणपत्र देणे.

(Provisional Regisration Certificate).

६) "भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४" मधील विविध कलमातील तरतुदींची व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे व त्यांचे संनियंत्रण करणे.

७) "मिनीमम स्टँडर्ड ऑफ व्हेटरनरी एज्युकेशन रेग्युलेशन्स, १९९३" बाबत कार्यवाही करणे.

८) "१९९२ च्या नोंदणी संदर्भातील रेग्युलेशन्सचे" संनियंत्रण करणे.

९) पशुसंवर्धन खाते व शासनाला कायद्यातील तरतुदींच्या संदर्भात माहिती पुरविणे/मार्गदर्शन करणे.

१०) कायद्यातील तरतुदीनुसार पशुधन पर्यवेक्षक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी,पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, उपआयुक्त पशुसंवर्धन, सहआयुक्त पशुसंवर्धन, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन व आयुक्त पशुसंवर्धन या व इतर पदांच्या सेवाभरती नियमामधे सुधारणा करण्यास्तव शासनास मार्गदर्शन करणे व पाठपुरावा करणे.

११) कायद्यातील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकता भासल्यास मा. उच्च न्यायालयात / मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे.

**३) राज्य परिषदेची रचना :-**

महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेची स्थापना भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४ चे कलम ३२ नुसार करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, असाधारण क्र. ८३, दिनांक ३१ जुलै २००९, अन्वये शेवटचे ३ सदस्य नामनिर्देशित केल्याप्रमाणे व भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४ चे कलम ३२ नुसार सर्व सदस्यांची संख्या पूर्ण झाल्यामुळे कार्यकारिणीची पहिली सभा दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजी झाली व त्यात डॉ. दिलीप दादा घोरपडे यांची निवडणुकीद्वारे अध्यक्ष म्हणून निवड झाली व महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर खऱ्या अर्थाने कार्यान्वित झाली.

परिषदेची कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | कलम | प्रकार | शासन राजपत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. घोरपडे दिलीप दादा | अध्यक्ष | ३२ (l)(a) | निवडणुकीद्वारे | महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-अ प्राधिकृत प्रकाशन दिनांक २७ डिसेंबर २००७. |
| २. | डॉ. अहेर विलास दौलतराव | सदस्य | वरीलप्रमाणे | निवडणुकीद्वारे | |
| ३. | डॉ. गावंडे अजय पांडुरंगराव | सदस्य | ३२ (l)(a) | निवडणुकीद्वारे | |
| ४. | डॉ. डख आबासाहेब रामराव | सदस्य | ३२ (l)(a) | निवडणुकीद्वारे | |
| ५. | डॉ. सी. एस. प्रसाद | सदस्य | ३२ (l)(b) | पदसिध्द. | |
| ६. | डॉ. मनुरकर भगवान शंकरराव | सदस्य | ३२ (l)(c) | नामनिर्देशित | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक ८३, दिनांक ३१ जुलै २००९. |
| ७. | डॉ. जाधव प्रविण तुकाराम | सदस्य | ३२ (l)(c) | नामनिर्देशित | |
| ८. | डॉ. पाटील द्रोणाचार्य जगतराव | सदस्य | ३२ (l)(c) | नामनिर्देशित | |
| ९. | श्री. एकनाथ डवले, I.A.S. | सदस्य | ३२ (l)(d) | पदसिध्द | |
| १०. | डॉ. मोरे विश्वासराव मधुकरराव | सदस्य | ३२ (l)(e) | नामनिर्देशित | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-चार-अ, दि.२ फेब्रुवारी २००९ |
| ११. | डॉ. एम. जी. गच्चे | निबंधक तथा सदस्य | ३२ (l)(f) | पदसिध्द | |

**४) कार्यकारी समिती :-**

**(१)** भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ चे कलम ४० अन्वये तथा महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद २००२ मधील भाग-६ मधील कलम क्रमांक ७ (१) नुसार कार्यकारी समिती (Executive Committee) तसेच Disciplinary Committee स्थापित करण्यात आलेल्या आहेत. कार्यकारी समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | डॉ. घोरपडे दिलीप दादा | अध्यक्ष | निवडणुकीद्वारे |
| २. | डॉ. अहेर विलास दौलतराव | सदस्य | निवडणुकीद्वारे |
| ३. | डॉ. गावंडे अजय पांडुरंगराव | सदस्य | निवडणुकीद्वारे |
| ४. | डॉ. पी. टी. जाधव | सदस्य | शासन नामनिर्देशित |
| ५. | डॉ. विश्वासराव मधुकरराव मोरे | सदस्य | महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटनाद्वारे |
| ६. | डॉ. मारोती गणपती गच्चे | सदस्य | पदसिध्द (Ex-Officio). |

**(२) डिसीप्लीनरी कमिटी :- खालीलप्रमाणे आहे.**

पशुवैद्यकीय सेवा देताना घडलेल्या अनियमिततेबाबत किंवा दोषपूर्ण वर्तनाबाबत येणाऱ्या तक्रारी निवारणासाठी ही कमिटी स्थापीत केलेली आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. पी. टी. जाधव | अध्यक्ष |
| २. | डॉ. गावंडे अजय पांडुरंगराव | सदस्य. |
| ३. | डॉ. जी. के. उराडे | सदस्य |
| ४. | डॉ. एस. आर. जोशी | सदस्य |
| ५. | डॉ. एम. जी. गच्चे | सदस्य |

**(३) इमारत :-**

१) सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेची स्वतःची इमारत नाही. राज्य परिषदेची स्वतःची इमारत बांधण्याकरिता राज्य शासनाने पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, नागपूर यांचे आवारातील ५०,००० वर्ग फूट जागा उपलब्ध करून दिली आहे. नवीन इमारती-करिता नकाशे व अंदाजपत्रके बांधकाम विभागाकडून तयार करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

२) सध्या परिषदेचे कार्यालय जुन्या आधारभूत ग्राम केंद्राचे इमारतीत कार्यरत आहे. या इमारतीच्या विशेष दुरुस्तीकरिता सन २००८-०९ रुपये १९,७८,०२४ लक्ष तर सन २०१०-११ मध्ये रुपये १०,५६,७६० निधी (गॅरेज बांधकाम रुपये ३.६६ लक्ष, हॉलमध्ये जाळीचे गेट इतर संकीर्ण कामासाठी रुपये २.४४ लक्ष, स्वच्छतागृह तयार करण्यासाठी रुपये ४.४७ लक्ष) स्वेच्छा निधीतून मंजूर झाला असून विशेष दुरुस्तीचे कार्य सुरू आहे.

**६) वेबसाईटचे उद्‌घाटन** :-

महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषदेने दिनांक २० एप्रिल २०१० रोजी Executive Committee च्या सभेत Website चे (www.msvc.in) चे उद्‌घाटन केले. वेबसाईटवर नोंदणी, नोंदणी नूतनीकरण व पदविधरांची यादी व इतर अर्ज तसेच Veterinary Council of India Act, 1984, Maharashtra State Veterinary Council Act, 2005 इत्यादि विषयी माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा वापर फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी/नोंदणीची मुदत (Validity) तपासणीसाठी करू शकतात.

**७) नोंदणी संबंधी माहिती :- दिनांक ३० जून २०११ पावेतोची स्थिती.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नोंदणी पुस्तकानुसार नोंदणीकृत पशुवैद्यकांची संख्या | :- | ८६१७ |
| २) | पदविका धारण करीत असल्यामुळे वगळण्यात आलेल्यांची संख्या | :- | २७२ |
| ३) | इतर राज्यात गेल्यामुळे व इतर कारणामुळे कमी झालेली नोंदणी. | :- | ४५ |
| ४) | कमी केलेल्या पदविधारकांची संख्या | :- | ११ |
| ५) | मृत झालेल्याची संख्या | :- | ३ |
| ६) | प्रत्यक्षात १९८४ चे कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या नोंदणीकृत पदवीधर पशुवैद्यकांची संख्या. | :- | ८२८६ |

**(ब) दिनांक १ एप्रिल ११ ते ३० जून ११ पर्यंत कार्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | भाग एक अंतर्गत नूतनीकरण. (Renewal done) | :- | १०६ |
| २) | नवीन नोंदणी केलेले पदवीधर. | :- | १ |
| ३) | तात्पुरते नोंदणी प्रमाणपत्र वाटप. (For internship Programme) | :- | -- |
| ४) | नाहरकत प्रमाणपत्र (परस्पर दिलेले) | :- | -- |
| ५) | डुप्लीकेट प्रमाणपत्र वाटप. | :- | १६ |
| ६) | पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नोंदी घेतलेले. | :- | १८ |

♦♦♦